"विभागीय संदर्भ सेवा, रुग्णालय, नाशिक व अमरावती येथील सुरक्षा रक्षक सेवा सुरु ठेवण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१९/प्र.क्र.१४०/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ०३ जुलै, २०१९.

वाचा :

१) सह संचालक, आरोग्य रुग्णालय राज्यस्तर, मुंबई यांचे पत्र क्रमांक- ससंआसे/कक्ष-३/टे.३/विसंसेरु/सुरक्षा रक्षक/४७१-४७५/१९ दिनांक १०.०१.२०१९.

प्रस्तावना:

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक व अमरावती येथील सुरक्षा रक्षकांच्या कंत्राटी सेवा घेण्यासाठी ई-निविदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक व अमरावती करीता प्रत्येकी १८ कंत्राटी सुरक्षा सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी प्रत्येकी रु.३४,७७,६००/- इतक्या किंमतीस खालील प्रमाणे प्रशासकीय मान्याता देण्यात येत आहे. :-

अ.क्र.	रुग्णालयाचे नाव	मासिक वेतन	आवश्यक पदे	मासिक खर्च	अंदाजित वार्षिक खर्च
१	विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती	प्रती महिना रु.१६,१००/-	१८	रु.२,८९,८००/-	रु.३४,७७,६००/-
२	विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक	प्रती महिना रु.१६,१००/-	१८	रु.२,८९,८००/-	रु.३४,७७,६००/-
					रु.६९,५५,२००/-

२.अटी व शर्ती-: सदर खरेदीसाठी शासन निर्णय, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग III/उदयोग-४, दि.०१.१२.२०१६ अन्वये प्रसिध्द केलेल्या सुधारीत नियमपुस्तिकेत विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मदतीने त्यांचे कार्यालयाचे मोजमाप करुन व त्यानुसार जिल्हा निश्चित करुन सुरक्ष रक्षकांची संख्या निश्चित केलेली असावी.

२. बाहययंत्रणेद्दवारे काम करुन घेताना शान निर्णय क्र.एसजीए-१५०६/प्र.क्र.९१/काम-५, दि.०८.११.२००६ मधील तरतुदीनुसार पुर्तता करण्यात यावी.

३. शासनाने मान्यता दिलेल्या सुरक्षा मंडळ अथवा मेस्को यांचेकडून सुरक्षा रक्षक घेण्यास प्रथम प्राध्यान्य दयावे. त्यांचकडून सुरक्षा रक्षक सेवा उपलब्ध न झाल्यास सर्व रुग्णालयांसाठी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया एकाच वेळी व राज्यस्तरावर पार पाडून अत्यंत पारदर्शक पध्दतीने बाहययंत्रणेची निवड करण्यात यावी.

४. सेवा पुरवठादार राज्य स्तरावर अथवा विभागीय स्तरावर किंवा जिल्हा स्तरावर निश्चित करण्यात यावा.

५. रुग्णालयासाठी मान्य केलेल्या सुरक्षा रक्षकांची संख्या ही कमाल मर्यादा असून स्थानिक गरजेनुसार त्यांची संख्या संबंधित जिल्हा अधिकारी यांनी मंजुर करुन घ्यावी.

६. सुरक्षा रक्षकांचे वेतन त्यांच्या बॅक खात्यात जमा झाल्याची खात्री केल्याशिवाय पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही अशी अट Tender document मध्ये समाविष्ट करण्यात यावी.

७. प्रस्तावित दर हे अंदाजित आहेत.त्यामुळे प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजारभावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधीत पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

८. संपूर्ण प्रक्रिया राबवितांना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelince) तंतोतंत पालन करण्यात यावे.

९. प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर केंद्रीय खरेदी समितीच्या मान्यतेनंतरच पुरवठा आदेश निर्गमीत करण्यात यावेत.

१०. सदर खरेदी ३.०० लक्ष पेक्षा जास्त असल्याने ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करण्यात यावी.

३. सदर खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजुर करण्यात आलेलया तरतूदीमधून भागविण्यात यावा.

४. मागणी क्र.आर-१, २२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, (०६) (२१) महसूल विभागाच्या मुख्यालयांच्या ठिकाणी विभागीय संदर्भीय सेवा केंद्र स्थापन करणे (अनिवार्य) (२२१० ४२५९) या लेखाशिर्षाखालील "१३-कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टाखाली मंजुर करण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय, शासन निर्णय, शासन निर्णय,वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि.१७.४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८,भाग पहिला, उपविभाग-दोन मधील अ.क्र.४,नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२६१३२१०६८८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.07.03 11:37:23 +05'30'

(रो.दि.कदम पाटील)
अवरसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल- १ / २, महाराष्ट्र, (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सह संचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालय राज्यस्तर), मुंबई.
५. अधिक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक व अमरावती
६. जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक व अमरावती
७. वित्त विभाग (कोषागारे/ प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती (कार्यासन आरोग्य-३).